**<u>प्रतिवादी क्र.१/क तर्फे उर्वरीत उलटतपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील.</u>**

**१४**. मला न. भू. क्र.१०४८ मधील विहिरीचे खोदकाम किती दिवस चालू होते व त्यासाठी किती खर्च आला याबाबत माहिती नाही. सदर विहिरीचे पाच ते सहा फूट खोलीचे चि–याचे बांधकाम झाले आहे. मला सदरचे बांधकाम कधी व त्यासाठी किती खर्च आला तसेच ते कोणत्या गवंडयाने केले याबाबत माहिती नाही. सदर विहिरीतून पाणी काढण्यासाठी एका बाजूला लोखंडी रहाट आहे. मला तो रहाट त्या विहिरीवरती कधीपासून आहे याची माहिती नाही. सदर विहिरीवरील रहाट बोळाच्या बाजूला आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी देखील त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे सदर विहिरीचे पाणी वापरतात. आमच्या न. भू. क्र.१०४९ च्या घराच्या पश्चिम बाजूला बोळ आहे. आमच्या घराच्या पश्चिम भिंतीला कोणताही दरवाजा नाही.

**१६**. माझी जन्मतारीख १९.०७.१९८२ आहे. मला जमीन मिळकतीच्या कागदपत्राचे ज्ञान माझ्या वयाच्या २० ते २१ व्या वर्षी आले होते. माझे वडिल सन २०१८ मध्ये वारले आहेत. माझे वडिल त्यांच्या मृत्यूपर्यंत जमिनीचे व न्यायालयीन कामकाज पाहत होते.

**१७**. आजरा शहरात नगर भूमापन योजना १९७३ साली अमलात आली. त्यावेळी माझा जन्म नसल्यामुळे कर्मचा–यांनी कोणती कृती करुन योजना अमलात आणली याची वैयक्तिक माहिती नाही. आमच्या वडिलांनी नि. दि. दा. क्र.७७/२००७ हा न. भू. क्र.१०४९ व १०५० च्या सिटी सर्वे दप्तरी दाखल असलेल्या क्षेत्राबाबत केला होता. त्यांनी सदर दावा मिळकतीची पत्रके, सनद व चौकशी उता–याच्या कागदपत्रां वरती दाखल केला होता.

**१८**. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी २०१९ मध्ये उपअधिक्षक, भूमि अभिलेख, आजरा यांच्याकडे नगर भूमापन योजनेच्या अंमलबजावणी बाबत तक्रार अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या अर्जावर सदर कार्यालयात न. भू./ फेरचौकशी/ १९/२०१९ चालला होता. माझ्या वडिलांनी नगर भूमापन योजने

बाबत २०1३ साली तक्रार केली होती. मला त्या तक्रारी बाबतचे प्रकरण कोणत्या कार्यालयात चालले व त्याचे पुढे काय झाले याबाबत आठवत नाही.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी अधिक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर यांच्याकडे न. भू. अपिल/ एस. आर./१००८/ २०२० दाखल केले होते. त्याचा निकाल माझ्या वडिलांच्या विरोधात लागला होता. मी अथवा माझ्या वडिलांनी सदर निकाला विरोधात वरिष्ठ अधिका–यांकडे दाद मागितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये आजरा शहरातील नगर भूमापन योजना योग्य असल्याचा निकाल देण्यात आला होता. आम्ही या दाव्या व्यतिरिक्त नगर भूमापन योजना चुकीची असल्या बाबत इतर कोठेही दाद मागितलेली नाही.

**२०.** संपुर्ण दावा मिळकतीत वादी व प्रतिवादींची ताबेवहिवाट मला कळते तेव्हापासून तशीच असून त्यामध्ये बदल झालेला नाही. सदर ताबेवहिवाटी इचलकरंजीकर जहागीरदारांनी दिला त्याच पध्दतीने आहे. मला त्यामध्ये कधी बदल झाला याबाबत सांगता येणार नाही. माझ्या वडिलांनी न. भू. क्र.१०४९ मधील ६५.२ चौ. मी. आणि न. भू. क्र.१०५० मधील ३४.२ चौ. मी. जागा चुलते शिवराम पारपोलकर यांच्याकडून जागेचया चतुःसिमा नमूद करुन विकत घेतलेली आहे. माझ्या वडिलांनी न. भू. क्र.१०४९ व १०५० मधील चुलते शिवराम यांच्या मालकीची अर्धी जागा विकत घेतली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो, त्याच्या वडिलांनी न. भू. क्र.१०४९ व १०५० च्या उता–यामधील चुलत्यांच्या नावे दिसत असणारी जागा विकत घेतली होती.

**२१**. न. भू. क्र.१०४९ चे मिळकत पत्रीकेवरील क्षेत्र १३०.४ चौ. मी. आणि न. भू. क्र.१०५० चे मिळकत पत्रीकेवरील क्षेत्र ६९.७ चौ. मी. आहे. न. भू. क्र.१०४८ चे मिळकत पत्रीकेवरील क्षेत्र ३६ चौ. मी. आहे. सदर तीनही मिळकतींच्या क्षेत्रांची बेरीज २४०० चौ. फूट पेक्षा जास्त होते. माझ्या म्हणण्याप्रमाणे इचलकरंजीकर जहागीरदारां कडून मूळ सात ब्लॉक धारकांना प्रत्येकी २४०० चौ. फूट मिळायला पाहिजे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ २४०० चौ. फू. गुणिले ७ होत

नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये आमची व प्रतिवादींची त्यांच्या नावावर असलेल्या न. भू. क्रमांका नुसार मालकी व ताबेवहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करुन नि. क्र.१०८ व १२१ प्रमााणे खोटे शपथपत्र दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १०.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते